**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक** - 48 **विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक** -160 **दिनांक** – 20/05/2025

**विभाग – सार्व.बांधकाम विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय** – आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत सीना नदीतील गाळ काढून खोलीकरण व रूंदीकरण करणे व सीना नदीवर पूर संरक्षक भिंत बांधणे या कामांना प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करून देणे बाबत

--**--

**ठराव** – विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार मा. आ. श्री. संग्राम जगताप, विधानसभा सदस्य, अहिल्यानगर शहर विधानसभा मतदारसंघ यांचे संदर्भ क्र. २ चे पत्रांवर मा. मंत्री, जलसंपदा, (विदर्भ, तापी व कोकण, खोरे विकास महामंडळ) आपत्ती व्यवस्थापन, महाराष्ट्र शासन यांचे पृष्ठांकन केलेले असून सदर पत्र या कार्यालयास प्राप्त झालेले आहे. सदर पत्रान्वये, सीना नदीतील गाळ काढून खोलीकरण व रुंदीकरण करणे व सौना नदीवर पूर संरक्षक भित बांधणे या कामांना आपत्ती सौम्यीकरण योजनेअंतर्गत रु २०.००.कोटीचा निधी उपलब्ध करून देणेस मागणी शासनास करण्यात आलेली आहे. शासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग यांचेकडील पत्र क्र. संदर्भ क्र. की आयपी १११,११२/२५/आव्यप्र २ दि. २४ मार्च २०२५ (प्राप्त दि. २१/०४/२०२५)चे पत्रान्वये, आवश्यक तो प्रस्ताव एन.डी.एम.ए. च्या मार्गदर्शक सुचनेतील (एन.डी.एम.ए. च्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे) पी. एफ. सी. (Pre-Feasibility Check) च्या नमुन्यात जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाच्या ठरावासह शासनास तात्काळ सादर निर्देश दिलेले आहेत.

सदर विषयाबाबत माजिल्हा आपत्ती व्यवस्थापन ,निवासी जिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी . अहिल्यानगर यांचेकडील ,प्राधिकरण पत्र क्र. १/१०९४३४/२०२३ दिनांक ०६/०९/२०२३ चे पत्रान्वये राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सुचनांमधील पृष्ठ क्र. ५६-६५ वर असलेल्या आपत्ती व त्या आपत्तीबाबत करावयाच्या रचनात्मक उपाययोजनांची यादी विचारात घेऊन तसेच सदर मार्गदर्शक सूचनांसोबतच्या पो. एफ. सी. (Pre-Feasibility Check) च्या नमुन्यामध्ये सादर करणेबाबत कळविण्यात आलेले होते.

सबब मा. आ. श्री. संग्राम जगताप, विधानसभा सदस्य, अहिल्यानगर शहर विधानसभा मतदारसंघ यांचे पत्राच्या अनुषंगाने शासनाचे मार्गदर्शक सूचनांनुसार प्रस्ताव तयार करावा. सदर प्रस्तावामध्ये आपत्तीचा तपशिल नमूद करावा तसेच मार्गदर्शक सुचनांनुसार या अंतर्गत ज्या रचनात्मक उपाययोजनांबाबत प्रस्ताव सादर केला आहे त्याबाबतच्या आपत्ती प्रवणतेचा उल्लेख तसेच सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने कोणत्या आपत्तीचे सौम्यीकरण होणार आहे त्याबाबतच्या सुस्पष्ट माहितीसह परिपुर्ण प्रस्ताव माजिल्हा आपत्ती व्यवस ,निवासी जिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी .्थापन प्राधिकरण , अहिल्यानगर यांचेकडील पत्र क्र. १/१०९४३४/२०२३ दिनांक ०६/०९/२०२३ च्या पत्रासहच्या नमुन्यात या कार्यालयास तातडीने सादर करणेबाबत माजिल्हा ,निवासी जिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी . ,आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अहिल्यानगर यांचेकडील पत्र क्र. COLAHM-२७०१३(११)/२९ दि२०२५/०४/२२.अन्वये कळविले आहे.

सदर योजनेत सन  अंतर्गत यापूर्वी रक्कम रु.२०.०० २४-२०२३कोटी खर्चाचा प्रकल्प अहवाल मिळालेल्या मंजूरीनुसार प्रस्तुत कामाची तांत्रिक मंजूरी ही जलसंपदा विभागाकडुन घेण्यात यावी तसेच कामासंदर्भात निविदा प्रक्रिया करुन न्युनतम अर्थिक देकारास व कामाच्या दरास मान्यता मिळणेबाबतच्या प्रस्तावास जलसंपदा विभागाची शिफारस घेऊन शासनास प्रस्ताव फेर सादर करणेबाबत शासनाने दि २. जानेवारी २०२५ ,रोजी कळविले आहे कुकडी पाटबंधारे ,कार्यकारी अभियंता .त्यानुसार मा ,विभाग क्र ,२. .अहिल्यानगर यांचेशी पत्रव्यवहार करणेत येत असून त्याप्रमाणे कार्यवाही प्रस्तावित आहे .जि ,श्रीगोंदा सदर काम वगळता उर्वरीत ठिकाणी  विषयांकीत कामाचा रक्कम रु.२०.००कोटी खर्चाचा प्रस्ताव चेनेज नंबर टाकुन करणेत  येईल .

शासन निर्णय क्र २-आव्यप्र/क्र.०१.प्र/२०२४-आव्यप्र.दि १०.जानेवारी२०२४ ,अन्वये एन.डी.एम.ए. ने निश्चित केलेल्या पी. एफ. सी. (Pre-Feasibility Check) व डीआर च्या नमुन्यामध्ये सादर करणे .पी. .बंधनकारक आहेत्यामुळे या प्रकल्पासाठी मनपाच्या पॅनेलवरील अशा कामाचा अनुभव असलेल्या मे . १.७० लातूर यांची नेमणूक करुन मंजूर प्रकल्प किंमतीच्या ,इंजिनियर्स .अथर्व इंफ्रा% प्रमाणे प्रत्येक टप्प्यानुसार काम देणे योग्य आहे .

तरी याबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणेकामी दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार रक्कम रु २०.००.कोटीचा प्रकल्प अहवाल तयार करणेकामी मेलातूर यांची  ,इंजिनियर्स .अथर्व इंफ्रा . नेमणूक करणेस व सदर प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर तांत्रिक मान्यतेसाठीमा ,कार्यकारी अभियंता . अहिल्यानगर यांचेकडेस सादर करणेस व याकामी .जि ,श्रीगोंदा ,कुकडी पाटबंधारे विभाग क्र.२असणारी फि अदा करणेस मा. प्रशासक महासभेची मंजुरी देण्यात येत आहे. याबाबत विभागाने योग्य ती कार्यवाही करावी.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
( **मेहेरे लहारे** )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

सही/-
(यशवंत डांगे)
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक -48 विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक** -161 **दिनांक** – 20/05/2025

**विभाग – पाणी पुरवठा विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय** – मौजे केडगांव ता.जि अहिल्यानगर येथील स.नं. 481 येथे स्वखर्चाने पाण्याची टाकी उभारणे साठी परवानगी मिळणे बाबत

--**--

**ठराव** –विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार श्री.सचिन भानुदास कोतकर रा.एकनाथ नगर केडगांव देवी अ.नगर यांचा दि.15/01/2025 रोजीचा अर्ज व सौ.सुरेखा भानुदास कोतकर रा.केडगांव देवी अ.नगर यांचादि.22/01/2025 रचा अर्ज इकडेस प्राप्त झाला असून त्यात मौजे केडगांव ता.जि. अहिल्यानगर येथील सर्व्हे नं.४८१ येथे स्वखर्चाने पाण्याची टाकी उभारणीसाठी आम्ही यश इनोव्हेटिव्ह सोल्युशन्स एल.एल.पी छत्रपती संभाजीनगर या मान्यता प्राप्त संस्थेकडून ड्रॉईंग व डिझाईन आपणाकडे परवानगीसाठी सादर करीत आहोत तरी स्वखर्चाने पाण्याची टाकी उभारणेसाठी परवानगी मिळणे बाबत इकडेस विनंती केलेली आहे.

मौजे केडगांव ता.जि. अहिल्यानगर येथील सर्व्हे नं.४८१ व लगतचे सर्व्हे नंबर ४६०/१अ ,४६०/१अ/२, ४६०/१ब ,४८०,४८१/१,४८१/२, ४८१/३,४८१/४,४८१/५,४८३/१,४८३/३ येथे अहिल्यानगर महानगरपालिकेच्या नगररचना विभागा मार्फत जमिन अकृषित करणे करिता आराखडयास (लेआउट ) तात्पुरत्या स्वरूपात मंजूरी दिलेली आहे. या आराखडयात एकूण ६१७ प्लॉट निर्माण होणार आहेत. प्रत्येक प्लॉटवर ०१ सदनिका जरी उभारली गेली व प्रत्येक सदनिकेत सरासरी ०५ नागरिक वास्तव्यास आले, त्यांना नियमानुसार दररोज दरडोई १३५ लीटर पाणी पुरवठा करावयाचा झाल्यास 416475 लीटर इतका अतिरिक्त पाण्याची गरज भासणार आहे.

मंजूर आराखडयाच्या नजीक अहिल्यानगर महानगरपालिकेची ओंकार नगर येथील 18 लक्ष लीटर क्षमतेची उंच पाण्याची टाकी आहे. मंजूर आराखडा हा उंचावर असून नगर उंच टाकीतून तेथे थेट पाणी पुरवठा करणे शक्य नसल्याने प्रथम दर्शनी निदर्शनास येते.

विकासकाने मे.यश इनोव्हेटिव्ह सोल्युशन्स एल.एल.पी या मान्यता प्राप्त संस्थेकडून ड्रॉईंग व डिझाईन तयार करून घेतलेले आहेत. यात विकासकाला ओंकार नगर पाण्याची टाकी येथे सर्व्हे नं. 481 पर्यत 200 एम.एम.DI K- प्रकारची 1400 मी.इतकी गुरूत्वावाहिनी अंथरणे 60000 ली.क्षमतेचा संपवेल उभारणे, पंपहाऊस उभारणे, पंपींग मशिनरी बसविणे, संपवेल ते उंच टाकी 150 एम.एम. DI K- प्रकारची उर्ध्ववाहिनी अंथरणे तसेच 3 लक्ष लीटरची उंच टाकी उभारणे इ. कामे करण्याची सुचविली आहेत.

कृ.मा.प.

मंजूर आराखडयास अंतिम मंजूरी मिळाले नंतर तेथे मोठया प्रमाणात लोकवस्ती होणार आहे. तेथील लोकवस्तीस पाणी पुरवठया सारखी प्राथमिक गरज भागविणे करिता भविष्यकाळात अहिल्यानगर महानगरपालिकेस मे यश इनोव्हेटिव्ह सोल्युशन्स एल.एल.पी यांनी सुचविलेल्या पायाभूत सुविधा उभाराव्या लागणार आहेत. याकरिता महाराष्ट् जीवन प्राधीकरणाच्या सन 2023-2024 च्या दरसुचीनुसार साधारण रू 1,70,31,958/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

विकासकास स्वखर्चाने पाण्याची पाईप लाईन व उंच टाकी उभारण्यास परवानगी दिल्यास अहिल्यानगर महानगरपालिकेचा पायाभूत सुविधा उभारणे करिता लागणा-या खर्चात बचत होणार आहे विकासका मार्फत स्वखर्चाने जलवाहिनी अंथरणे, पाण्याची टाकी उभारणे इत्यादी कामे पूर्ण झालेनंतर तसेच यंत्रणा कार्यान्वीत झालेनंतर अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्रचलीत नियमानुसार त्या यंत्रणेतून इतर नागरिकांना पाणी पुरवठा करण्याचे अधीकार अहिल्यानगर महानगरपालिकेचा राहील. या अटी व शर्तीस अधीन राहून यंत्रणा उभारणे करिता मा.प्रशासक स्थायी समितीने मंजूरी दिल्यानुसार सदरच्या प्रस्तावास प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.विभागाने पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
( **मेहेर लहारे** )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

सही/-
(यशवंत डांगे)
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**

नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक** - 48 **विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक** -162 **दिनांक** – 20/05/2025

**विभाग– पाणी पुरवठा विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय** – अहिल्यानगर महानगरपालिकेस अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रातील वाहतुक व्यवस्था सुरळीत /नियत्रित करणेच्या दृष्टीकोनातून करावयाच्या उपाय योजना बाबत.

--**--

**ठराव** – विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार दिग्वीजय एन्टरप्रायजेय नाशीक यांचे दि.30/12/2024 रोजीचे पत्र प्राप्त झाले असून पे अॅण्ड पार्क, नो पार्किग टोईग काम करणे संदर्भात कार्यादेश देण्यात आलेला आहे. अहिल्यानगर महानगरपालिकेकडे पायाभूत सुविधा करणेसाठी पुरेसा कालावधी मिळावा अशी विनंती करण्यात आली होती. आज रोजी सदर पायाभूत विधांचे कामकाज पुर्णत्वाकडे येत असूनद् 01/01/2025 पासून पुढील 5 वर्षाच्या कालावधी करिता आम्ही कार्यादेशानुसार कामकाज सुरू करत आहोत असे इकडेस कळविले आहे.

शहरातील महत्वाच्या रस्त्यावर गरजेचे वेळेस सतत होणारी वाहतुक कोंडी टाळणेसाठी उपाय योजना करणे आवश्यक व क्रमप्राप्त असल्याने त्यासाठी खाजगी एजन्सी मार्फत सर्व्हेक्षण करून नो-पार्कींग झोन ठरविणे, नो-हॉकर्स झोन ठरविणे, सम-विषम सशुल्क पार्कींग, एकेरी वाहतुक, महानगरपालिकेच्या मोकळया जागते पे अॅण्ड पार्क व अनुषंगीक सर्व बाबी विचारात घेवून त्याचा प्रकल्प अहवाल तयार करवून घेण्यात आला होता सदरची बाब धोरणात्मक असल्याने मा.महासभेसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यास मा.महासभेने मंजूरी दिलेली आहे.

अहिल्यानगर शहराच्या कार्यक्षेत्रातील विवीध ठिकाणी पे अॅण्ड पार्क व नो पार्कींग पॉलिसी राबविणे कामी खाजगी एजन्सीची नेमणूक करणे करिता निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती यशस्वी निविदाधारक दिग्वीजय एन्टरप्रायजेय नाशीक यांना इकडील जा.क्र. शहर पा.पु. 1617दि. 07/03/2024अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे. निविदा अटी शर्ती नुसार करारनामा करून कार्यारंभ आदेश मिळालेनंतर निविदाधारक यांनी 15दिवसाचे आत पे अॅण्ड पार्क जागेचा ताबा घेतील तसेच कार्यारंभ आदेश मिळालेपासून पुढील 3 महिन्यात सर्व ठिकाणी पार्कींग व्यवस्था उभी करणे बंधनकारक राहील असे नमुद केलेले आहे.

परंत दरम्यानच्या काळात लोकसभा निवडणूक व त्यासंदर्भात आचारसंहिता,विधानसभा निवडणूक, त्याबाबत आचार संहिता, पावसाळयाचा कालावधी तसेच अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रात मोठया प्रमाणात रस्त्याची कामे प्रगतीपथावर असल्याने या सर्व कारणांमुळे निर्देश फलक लावणे व इतर पायाभूत सुविधा उपलब्ध करणे दिग्वीजय एन्टरप्रायजेय नाशीक यांना शक्य झाले नसल्याने दि.01/01/2025 पासून संबंधीत एजन्सी यांना रॉयल्टी आकारणी करण्यात यावी. तसेच दि.01/01/2025 पासून पुढील पाच वर्षासाठी त्यांचा कामाचा कार्यकाळ गृहीत धरण्यात यावा यास प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| ( मेहेर लहारे ) | (यशवंत डांगे) |
| प्र. नगरसचिव | प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपालिका | अहिल्यानगर महानगरपालिका |

# अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर

नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - 48 विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक** -163 **दिनांक** – 20/05/2025

**विभाग–सामान्य प्रशासन विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय – 31मे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने अहिल्यानगर गौरव दिन साजरा करण्यासाठी निधी उपलब्ध होणे बाबत..**

--**--

**ठराव** – विभागाने प्रस्तावित केल्यानुसार मा.डॉ.राधाकृष्ण सिंधूताई एकनाथराव विखे पाटील , मंत्री,जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) महाराष्ट्र राज्य यांनी उक्त संदर्भिय पत्रान्वये कळविले की ,सोबत अध्यक्ष, विचार भारती,अहिल्यानगर यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने अहिल्यानगर गौरव दिन साजरा करण्यासाठी निधी उपलब्ध करून देणे बाबतचे स्वयंस्पष्ट निवेदन जोडत आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ह्या अहिल्यानगर जिल्ह्याचे भूषण म्हणून ओळखल्या गेल्या ज्यांच्या नावाने जिल्ह्याची ओळख संपुर्ण राज्यातच नव्हे तर जगभरात प्रसिद्ध झाली आहे .त्यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून ३१ मे २०२५ रोजी गौरव दिन साजरा करण्याचा मानस असून सदर कार्यक्रमासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत मागणी केलेली आहे.कृपया, सोबतच्या निवेदनाचे अनुषंगाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्याजन्मदिनाच्या निमित्ताने अहिल्यानगर गौरव दिन साजरा करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देणेबाबत उचीत कार्यवाही करावी ,अशाबाबत कळविले आहे .

प्रा.राम शिंदे ,सभापती ,महाराष्ट्र विधानपरिषद ,महाराष्ट्र राज्य यांनी उक्त संदर्भिय पत्रान्वये कळविले की ,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने अहिल्यानगर गौरव दिन साजरा करण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजना करीता रू 10.लक्ष निधी उपलब्ध करून देण्याबाबत विचार भारती प्रतिष्ठाण ,अहिल्यानगर यांनी विनंती अर्ज केला आहे .तरी अहिल्यानगर गौरवदिन साजरा करण्यासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत उचित कार्यवाही करावी ,अशाबाबत कळविले आहे .

अर्जदार श्री.अरूण कुलकर्णी ,अध्यक्ष,विचारभारती यांनी दिनांक 2025-04-16चे पत्रामध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे .

गेल्या वर्षी आपल्या शहर व जिल्ह्याचे अधिकृत नामांतर अहिल्यानगर असे झाले आहे .पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या आपल्या जिल्ह्याचे भूषण आहेत आणि म्हणूनच 31 मे हा त्यांचा जन्मदिन आपण अहिल्या नगर गौरव दिन म्हणून साजरा करतो, पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर यांचे कार्य जर आपण जाणून घेतलं तर कदाचित पुढच्या पिढीच्या जीवनाला एक दिशा मिळेल एक मार्ग मिळेल असे आम्हास वाटते, त्यांच्या कार्याची प्रेरणा एक अभिमान एक स्वाभिमान म्हणून आपण अहिल्या नगर गौरव दिनाच्या निमित्ताने नगरकरांसाठी मागील वर्षा पासून खास पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर यांच्यावर्षा पासून खास पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर यांच्या जीवनावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करत आहोत मागील वर्षीही असा प्रस्ताव आपण माननीय कलेक्टर साहेबाना केला होता परंतु मागील निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्या मुळे त्यावर आश्वासन मिळून ही कार्यवाही होऊ शकली नाही, तरी आपल्या शहराचे भूषण, अभिमान, स्वाभिमान, स्व ची जाणीव म्हणून हा कार्यक्रम होणे आणि पुढच्या पिढीच्या उज्वल भविष्य

आणि भवितव्यासाठी अश्या कर्तृत्वान मातृदेवतेचा जाणीव आणि जबाबदारी म्हणून कार्यक्रम होणे आणि पुढेही वर्षानुवर्षे चालू रहाणे या साठी आपत्या अखत्यारीत महानगरपालिकेने मागील खर्चाचा विचार



करता दहा लाख रुपये मंजूर करावेत व भवितव्याच्या दृष्टीने त्यात प्रति वर्षी एक ठराविक %वाढ मंजूर करावी ही विनंती व अपेक्षा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकराच कार्य आपण सर्वजण जाणताच ते आपल्या पुढच्या पिढीला ही अभिमानास्पद व प्रेरणादाई आहे त्यामुळे आपण सर्वांनी सहकुटुंब सहपरिवार उपस्थित रहाणे अपेक्षीत आहे ,अशाबाबत नमुद केलेले आहे .

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949चे कलम 66अन्वये महानगरपालिकेस स्वेच्छा निर्णयानुसार सादर कलमात नमूद केलेल्या बाबीसाठी किंवा अन्य कोणत्याही बाबीसाठी तरतूद करता येईल .अधिनियमातील कलम 66(41) मध्ये पुढील प्रमाणे तरतूद आहे .

"कोणतेही सार्वजनिक स्वागत समारंभ किंवा करमणुकीचे कार्यक्रम यासाठी कोणतेही अंशदान देणे;"

सन 2026-2025या आर्थिक वर्षामध्ये " सामाजिक संस्थांना देणगी " या लेखाशिर्षका खालील रक्कम रूपये 05लाख एवढी तरतुद करण्यात आली आहे .

तरी मा.डॉ.राधाकृष्ण सिंधूताई एकनाथराव विखे पाटील ,मंत्री,जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) महाराष्ट्र राज्य यांचे उक्त संदर्भिय पत्रान्वये व अर्जदार श्री.अरूण कुलकर्णी , अध्यक्ष,विचारभारती यांचे मागणी प्रमाणे 31मे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने अहिल्यानगर गौरव दिन साजरा करण्यासाठी रक्कम रूपये 10लाख देणेस प्रशासक सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे.

सद्यस्थितीमध्ये "सामाजिक संस्थांना देणगी" या लेखाशिर्षामध्ये फक्त रक्कम रूपये 5लाख शिल्लक असल्याने अंशदान देणेकामी " आकस्मीक खर्च " या लेखाशिर्षा मधून रक्कम रूपये 10लाख कमी करून सामाजिक संस्थांना देणगी या लेखाशिर्षामध्ये वाढ करण्यात यावी. यास प्रशासक सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे. याबाबत संबंधीत विभागने योग्य ती कार्यवाही करावी.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| ( मेहेर लहारे ) | (यशवंत डांगे) |
| प्र. नगरसचिव | प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपालिका | अहिल्यानगर महानगरपालिका |